# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
# नागपूर विभागीय शिक्षण मंडळ,नागपूर

पत्र क.नाविमं / प.उ.मा. / 115
नागपूर,दि 16/01/2020

प्रति,

मा.संचालक ,
माहिती प्रसिध्दी व जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषयः– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ. 12 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गूण देण्याबाबतची **सुधारित कार्यपध्दती**

संदर्भः–1. राज्य मंडळ पुणे,यांचे पत्र कं.रा.मं. / परीक्षा–7 / 21 दिनांक 02 / 01 / 2019.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ. 12 वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन. सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गूण देण्याबाबतची **सुधारित कार्यपध्दती** चे प्रकटन सोबत जोडलेले आहे. सोबतचे प्रकटन आपल्या कार्यकक्षेतील सर्व वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.

सोबतः– प्रकटनची प्रत

(रविकांत देशपांडे)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

प्रतिलिपीः–

1) सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य) भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली,गोंदिया यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
4) मुख्याध्यापक / प्राचार्य, (सर्व जिल्हे)सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये,प्रकटनातील निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करावी.
5) संपादक, तरुण भारत, लोकमत, दैनिक भास्कर, सकाळ, देशोन्नती, लोकसत्ता यांना माहितीस्तव आपल्या वृत्तपत्रातून विनामूल्य प्रसिध्दी द्यावी.

**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

जा. क्र.रा.मं./परीक्षा-७/21
दिनांक -०१/०१/२०१९
02

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा.संचालक,दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई-४०००३०
४) मा.संचालक,आकाशवाणी,मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०००२०
५)मा.संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तपत्र/ वृत्तवाहिन्या

**विषयः-** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतची **सुधारित कार्यपध्दती...**

महोदय,

शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत सुधारित कार्यपध्दती बाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी त्यांच्या वृत्तपत्रात/ प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे - ०४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण त्यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे
३) अस्वीस, राज्यमंडळ, पुणे
४) ग्रंथालय, राज्यमंडळ, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. अपर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. खाजगी सचिव, मंत्री,. शालेय शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई-४०००३२
३) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई-४०००३२
४) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे ४११००१

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय–** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतची **सुधारित कार्यपध्दती...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की,

१. शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० पासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत सुधारित कार्यपध्दती शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.उमाशि–२०१५/ प्र.क्र.२६२/ एस.डी.२ दि.२०/१२/२०१८ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे.

२. त्युनसार खेळाडू तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना द्यावयाची गुणांची सवलत मार्च २०१९ मध्ये होणाऱ्या इ.१० वी आणि इ.१२ वी च्या परीक्षांपासून लागू राहील.

याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. सन २०१९-२० पासून इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या क्रीडा गुणांची सवलत ही शासन निर्णयातील परिशिष्ट १ मधील सुधारित नियमावली नुसार परिशिष्ट ३ ते ५, ८ ते १० मधील आवश्यक कागदपत्रांच्या आधारे फक्त परिशिष्ट २ मधील क्रीडा स्पर्धा, परिशिष्ट ११ मधील खेळप्रकार व एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड ची शिबीरे यामध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या अथवा प्राविण्य संपादन करणाऱ्या खेळाडू/छात्र तसेच स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना परिशिष्ट ६ व ७ मध्ये नमूद केल्यानुसार सवलतीचे गुण अनुज्ञेय होतील.
२. १४ ते १६ वर्षाखालील गटात म्हणजेच इ.६ वी पासून इ.१० वी पर्यंत केव्हाही जिल्हा/विभाग/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांस मा.शा.प्र. (इ.१० वी) परीक्षेमध्ये परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सवलतीचे गुण देण्यात येतील. क्रीडा प्रमाणपत्रावर विद्यार्थी कितव्या इयत्तेत असताना खेळला त्या इयत्तेचा उल्लेख असावा.
३. तथापि इ. १० वी पूर्वी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळविलेले असले तरी, सवलतीचे गुण मिळण्याकरिता त्या विद्यार्थ्याने इ. १० वी मध्ये क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.
४. १८ वर्षाखालील गटात म्हणजेच इ.६ वी पासून इ.१२ वी पर्यंत केव्हाही जिल्हा/विभाग/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांस उ.मा.प्र. (इ.१२ वी) परीक्षेमध्ये परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सवलतीचे गुण देण्यात येतील. क्रीडा प्रमाणपत्रावर विद्यार्थी कितव्या इयत्तेत असताना खेळला त्या इयत्तेचा उल्लेख असावा.
५. तथापि इ. १२ वी पूर्वी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळविलेले असले तरी, सवलतीचे गुण मिळण्याकरिता त्या विद्यार्थ्याने इ. १२ वी मध्ये क्रीडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.(या खेळाडू विद्यार्थ्याने इ.६ वी ते इ.१० वी या कालावधीत प्राविण्य मिळविलेले असेल व याकरिता असलेले सवलतीचे गुणांचा लाभ एकदा घेतला असेल तर त्याला पुन्हा इ.१२ वी करिता याचा लाभ घेता येणार नाही तथापि या खेळाडू विद्यार्थ्याने इ.११ वी व इ.१२ वी मध्ये प्राविण्य/सहभाग घेतला असेल तर त्याला परिशिष्ट ६ प्रमाणे गुण अनुज्ञेय आहेत.)

६. खेळाडू कोणत्याही जिल्हयातून खेळला तरी, खेळाडू विद्यार्थी ज्या ठिकाणी शिकत असेल त्या जिल्हयाच्या क्रीडा अधिकारी यांनी त्यास प्रमाणित करावे.
७. इ. १० वी व इ. १२ वी च्या एन.सी.सी. चा छात्र तसेच स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांसाठी, विविध स्तरावरील शिबीरे तसेच संचलनाचा कालावधी हा त्या त्या शैक्षणिक वर्षातील इ. १० वी आणि इ. १२ वी च्या परीक्षेपूर्वीचा कालावधी ग्राहय धरण्यात येईल.
८. इ. १० वी व इ. १२ वी मध्ये शिकत असलेला खेळाडू विद्यार्थी हा एकापेक्षा अधिक खेळात/क्रीडा स्पर्धेत, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड ची शिबीरे यात सहभागी झालेला असेल तर त्याला उच्चतम असणाऱ्या एकाच सहभाग/प्राविण्याचे सवलतीचे गुण अनुज्ञेय राहतील.
९. संबंधित शाळा/क.म.वि. यांनी खेळाडूंचे परिपूर्ण प्रस्ताव विहित नमून्यात त्या शैक्षणिक वर्षात दि.१ जानेवारी ते ५ एप्रिल पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावेत. जे खेळाडू इ. १० वी व इ. १२ वी या इयत्तेपूर्वी खेळलेले असतील त्यांचे प्रस्ताव जानेवारी मध्येच जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करावेत.
१०. संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करून त्या शैक्षणिक वर्षातील प्रस्ताव दिनांक ३० एप्रिल पर्यत संबंधित विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशींसह सादर करावेत.
११. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट ११ मधील खेळ प्रकारांनाच गुणदान देण्यात येणार आहे.
१२. एखाद्या खेळाडू विद्यार्थ्याने क्लबकडून राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत केलेले प्रतिनिधीत्व अथवा संपादन केलेले प्राविण्य क्रीडा गुण सवलतीसाठी अनुज्ञेय असणार नाही.
१३. संबंधित समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना व जिल्हा संघटन आयुक्त, स्काऊट व गाईड यांनी त्या शैक्षणिक वर्षातील परिशिष्ट २ मधील नमूद शिबीरे/संचलन यामध्ये सहभागी होऊन यशस्वीपणे पूर्ण केलेल्या तसेच राष्ट्रपती पदक विजेत्या विद्यार्थ्यांची यादी त्या शैक्षणिक वर्षाच्या दि. १ मार्च पर्यंत स्वाक्षरीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावी.
१४. संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संबंधित शाळा/क.म.वि.चे महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडून प्राप्त झालेले विहित नमुन्यातील एन.सी.सी. व स्काऊट गाईड गुणांसाठीचे अर्ज, समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना व जिल्हा संघटन आयुक्त, स्काऊट गाईड यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिलेखानुसार छाननी करून त्या शैक्षणिक वर्षातील दि.३० एप्रिल पर्यंत संबंधित विभागीय मंडळ यांच्या कार्यालयास शिफारशीसह सादर करावेत.
१५. जिल्हास्तरावरील, विभागस्तरावरील, राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये केवळ प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांनाच गुणांची सवलत उपलब्ध राहील. मात्र आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर, प्राविण्य प्राप्त करणाऱ्या तसेच सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा गुणांच्या सवलती देय राहतील.
१६. इ.११ वी प्रवेशाकरिता खेळाडूंकरिता निश्चित करण्यात आलेला कोटा केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये सहभागी होणारे खेळाडू विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधील पदक विजेते खेळाडू विद्यार्थी यांच्या करिताच उपलब्ध राहील. अन्य खेळाडूंना विद्यार्थ्यांना परिशिष्ट ६ मध्ये विहित केल्याप्रमाणे फक्त गुणांची सवलत अनुज्ञेय राहिल.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त नमूद शासन निर्णयाची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

(डॉ अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक /०१/२०